सत्यमेव जयते




# अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

**मुख्यालय :** अर्जुन सेंटर ,बी.विंग,201/202 गोवंडी ,मुंबई -400088

दूरध्वनी क्र. 022-25500194 / 25500195/44515854

Website:arti.org.in E-mail: - esta.arti@gmail.com,


ARTI
शिक्षण संघटन विकास

जा.क्र/आर्टी-मुंबई /ASNRF/ अधिछात्रवृत्ती जाहिरात /२०२६-२७/१४२२ दिनांक-०३/०८/२०२६

**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई मार्फत अनुसूचित जातीतील मातंग, मांग, मिनीमादीग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी, मादगी, मादिगा या जातीतील विद्यार्थ्यांकडून वर्ष २०२३, २०२४ व २०२५ या कालावधीत पीएच.डी करीता कायम नोंदणी असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ASNRF पीएच.डी अधिछात्रवृत्ती (Ph.D. Fellowship) करिता ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत...**

अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई मार्फत अनुसूचित जातीतील मातंग, मांग, मिनीमादीग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी, मादगी, मादिगा या जातीतील संशोधक विद्यार्थ्यांकरीता अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (ASNRF) योजना राबविली जात आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनाने सर्वंकष धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार आर्टी, मुंबई संस्थेमार्फत दिनांक १ जानेवारी २०२३ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पीएच. डी करीता कायम नोंदणी असणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकडून पीएच. डी अधिछात्रवृत्ती वर्ष २०२३, २०२४ व २०२५ करीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर योजनेचा सविस्तर तपशील कालावधी, निवड पात्रता निकष, मार्गदर्शक सूचना आणि वेळापत्रक इत्यादी बाबतच्या माहितीकरिता आर्टी संस्थेच्या https://www.arti.org.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच संशोधक विद्यार्थ्यांनी https://fellowship.trti-maha.in या लिंकवरून ऑनलाईन अर्ज करावे.

अर्ज करण्याची सुरु दिनांक ०४/०८/२०२६

अर्ज करण्याचा अंतिम दिनांक :- ०३/०९/२०२६

स्वाक्षरी/-<br>
(सुनील वारे)<br>
व्यवस्थापकीय संचालक<br>
अण्णा भाऊ साठे संशोधन व<br>
प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई

# अण्णा भाऊ साठे राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

## Anna Bhau Sathe National Research Fellowship (ASNRF)

## पीएच.डी अधिछात्रवृत्ती जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत

**( शैक्षणिक वर्ष २०२३, २०२४ आणि २०२५ करिता )**

पीएच.डी अधिछात्रवृत्तीकरीता शासन निर्णय क्रमांक सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४) बांधकामे दि. ०१ जुलै २०२६, क्रमांक: बैठक -२०२४/प्र.क्र.०३/बांधकामे दिनांक ३०.०६.२०२६ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३, २०२४ आणि २०२५ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे

१. **वर्ष** -२०२३ (१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधी मधील नोंदणी असलेल्या) **एकूण १०० विद्यार्थी**
२. **वर्ष** -२०२४ (१ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधी मधील नोंदणी असलेल्या) **एकूण १०० विद्यार्थी**
३. **वर्ष**-२०२५ (१ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधी मधील नोंदणी असलेल्या) **एकूण १०० विद्यार्थी**

पीएच.डी करीता कायम नोंदणी असलेल्या प्रति वर्ष १०० विद्यार्थ्यांकडून अधिछात्रवृत्ती करीता अर्ज मागविण्यात येत आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी **http://trti.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर अर्ज भरावा. पीएच.डी करीता विद्यार्थी ज्या वर्षाकरीता विद्यापीठात नोंदणीकृत आहेत त्याच वर्षाकरीता त्यांचा अर्ज ग्राह्य धरला जाईल. (उदा. वर्ष २०२३ मधील नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी २०२३ करिताच अर्ज करणे आवश्यक आहे).

**विद्यार्थी निवड निकष:**

**१.** विद्यार्थी अनुसूचित जातीमधील **मातंग**, **मांग**, **मिनीमादीग**, **दखनी-मांग**, **मांग-म्हशी**, **मदारी**, **गारुडी**, **राधेमांग**, **मांग-गारोडी**, **मांग-गारुडी**, **मादगी**, **मादिगा** या जातीचा असणे आवश्यक आहे. (जातीचा दाखला आवश्यक)
**२.** महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
**३.** पीएच.डी अधिछात्रवृत्ती करीता अर्जदाराने **NET / SET / GATE / GPAT** किंवा कोणतीही समतुल्य राष्ट्रीय/राज्य/विद्यापीठस्तरीय संशोधन पात्रता परीक्षा (**PET**) विहित पात्रता गुणांसह (किंवा गुणांच्या आवश्यक मर्यादेसह) उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे.
**४.** पदव्युत्तर पदवी (**PG**) करीता किमान **B+** ग्रेड गुण मिळणे आवश्यक आहे.
**५.** लाभार्थ्याच्या कुटुंबाचे सरसकट वार्षिक उत्पन रुपये ८.०० लक्ष इतके मर्यादित असावे.
६. **वय-कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे**
(UGC-NET मार्गदर्शक सूचनांनुसार पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी वयोमर्यादा ३५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. उदा. सन २०२३ करिता दिनांक ०१.०६.२०२३ पर्यंत संशोधक विद्यार्थ्याचे वय 35 वर्षांपेक्षा जास्त नसावे.)
**७.** महाराष्ट्र शासनाच्या आरक्षणाच्या धोरणानुसार अधिछात्रवृत्ती ही योजना राबविणाऱ्या स्वायत्त संस्थांमधील समाज घटकांचे विद्यार्थी पात्र राहतील. तथापि, आरक्षणाच्या धोरणानुसार महिला करिता 30%, दिव्यांग करिता 5% व अनाथ करिता 1 % राहील (सदर आरक्षित जागेवर अर्ज प्राप्त न झाल्यास सर्वसाधारण जागेमधून उमेदवार घेण्यात येतील.)
**८.** सदर अधिछात्रवृत्ती योजनेचा लाभ जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठे किंवा विद्यापीठांना संलग्नित महाविद्यालयातील मान्यताप्राप्त संशोधन केंद्रात, केंदीय विद्यापीठे किंवा संसदीय कायद्यानुसार मंजूर राष्ट्रीय संशोधन संस्था येथे Ph.D साठी प्रवेशित (पीएच.डी कायम नोंदणी) असणे आवश्यक आहे.

९. ज्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा -**NET** (National Eligibility Test) व इतर राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली आहे, अशा विद्यार्थ्यांना प्राधान्य (Preference) दिले जाईल.

a. NET/ CSIR-NET/GATE/ GPAT/ICAR/AcSIR व समतुल्य परीक्षा उत्तीर्ण

**b.** SET / MCAER व समतुल्य परीक्षा उत्तीर्ण

c. PET

या क्रमाने प्राधान्य देण्यात येईल

प्राधान्यक्रम तसेच विद्यार्थी निवड प्रक्रिया याबाबत मा.अ.मु.स. (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक **१७/०६/२०२६** रोजी झालेल्या बैठकीनुसार, मा.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या निर्देशानुसार निर्णय घेण्यात येईल.

**शाखा निहाय विद्यार्थी संख्या**

| **अनु.क्र** | **शाखा** (stream) | **संख्या टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | विज्ञान व तंत्रज्ञान (Science and Technology) | ५५% |
| **२** | मानव्यविद्या व सामाजिक विज्ञान ( Humanities and Social Sciences) | २५% |
| ३ | आंतरविद्याशाखीय अभ्यास (Interdisciplinary Studies) | १०% |
| ४ | वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) | १०% |
| **एकूण** | | **१००%** |

**अधिछात्रवृत्तीचा कालावधी:**

**कमाल कालावधी:** फेलोशिपचा कमाल कालावधी ५ वर्षांचा असेल.

**मुदतवाढ:** ५ वर्षानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये मुदतवाढ दिली जाणार नाही

**कालावधी:** सुरुवातीला २ वर्षांसाठी फेलोशिप मंजूर केली जाईल.(JRF करिता )

**नूतनीकरण आणि पुढील कालावधीत (SRF)** करिता खालील अटींची पूर्तता झाल्यावरच लाभ अनुज्ञेय राहील

१. JRF कालावधीनंतर विद्यार्थ्यांने त्रिस्तरीय समिती अहवाल आणि Upgradation Certificate प्राप्त झाल्यानंतर SRF करिता नियमानुसार लाभ अनुज्ञेय राहील.

२. शोधनिबंध / प्रकाशन (Publication): किमान एक शोधनिबंध खालीलपैकी एका नामांकित जर्नलमध्ये प्रकाशित झालेला असावा:

Web of Science / Scopus-indexed जर्नल (शक्यतो **Q१/Q२** दर्जाचे) किंवा Clarivate चा Arts & Humanities Citation Index (**AHCI**), विज्ञान, अभियांत्रिकी (Engineering), कला, अर्थशास्त्र (Economics), व्यवस्थापन (Management), वैद्यकीय क्षेत्रासाठीचा **ABCD Index** किंवा इतर कोणत्याही प्रमाणित पीअर-रिव्ह्यू केलेल्या (Peer-reviewed) जर्नलमध्ये किमान **एक शोधनिबंध (Publication)** प्रकाशित असणे आवश्यक आहे.

३. युजीसी (UGC) च्या नियमांनुसार स्थापन केलेल्या संशोधन सल्लागार समितीद्वारे (**Research Advisory Committee - RAC**) दर सहा महिन्यांनी केले जाणारे सकारात्मक पुनरावलोकन (Positive biannual review) आवश्यक आहे.

**खालील नमूद कागदपत्रांची PDF करून सदर कागदपत्र स्व-साक्षांकित करून ऑनलाईन अर्जासोबत upload करावे. (टीप *केलेले कागदपत्र अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे)**

१. अर्जदाराचा फोटो *
२. आधार सीडिंग प्रमाणपत्र*
३. अर्जदाराची स्वाक्षरी*
४. आधार कार्ड*
५. पॅन कार्ड *
६. महाराष्ट्र रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate)*
७. जातीचा दाखला*
८. जातवैधता प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास)
९. उत्पन्नाचा दाखला*
१०. पदवी परीक्षा गुणपत्रक *
११. पदव्युत्तर परीक्षा गुणपत्रक *
१२. विद्यार्थ्याने NET/ CSIR-NET/GATE/GPAT/ICAR/ACSIR व समतुल्य परीक्षा SET/MCAER/PET व समतुल्य परीक्षा उत्तीर्ण बाबत प्रमाणपत्र*
१३. पीएच.डी कायम नोंदणी प्रमाणपत्र (Confirm Ph.D. Registration) *
१४. संशोधन केंद्र रुजू अहवाल (संशोधन केंद्राच्या लेटरहडवर) *
१५. दिव्यांगप्रमाण पत्र (लागू असल्यास)
१६. अनाथ प्रमाणपत्र (लागू असल्यास)
१७. स्वयंघोषणापत्र (कोणत्याही संस्थेत किंवा इतर ठिकाणी पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ नोकरी करीत नसल्याबाबत तसेच इतर कोणतीही अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्ती/DBT मिळत नसल्याबाबत) *
१८. राजपत्र (Gazette) - (नावात बदल असल तर)

***महत्वाची सूचना***

- सदर जाहिरातीद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या https://fellowship.trti-maha.in लिंकमधूनच ऑनलाईन अर्ज भरावा. (युजर आयडी व पासवर्ड विदयार्थ्यांनी आपल्या स्तरावर जतन करुन ठेवावा).
- दिनांक ०४/०८/२०२६ पासून ते दि. ०३/०९/२०२६ पर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करता येईल. दि. ०३/०९/२०२६ या कालावधी नंतर ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- ऑनलाईन अर्जाची एक प्रत विद्यार्थ्यांनी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची प्रत विहित वेळेत कार्यालयास प्राप्त होणार नाहीत असे अर्ज पुढील प्रक्रीयसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.
- जाहिराती सोबत जोडण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्व, वेळापत्रक यांच तंतोतंत पालन करावे.

स्वाक्षरी/--
**(सुनील वारे)**
**मा.व्यवस्थापकीय संचालक**
**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(आर्टी),मुंबई**

**पीएच.डी अधिछात्रवृत्ती बाबत शासन निर्णय क्रमांक सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४) बांधकामे दि. ०१ जुलै २०२६, क्रमांक: बैठक -२०२४/प्र.क्र.०३/बांधकामे दिनांक ३०.०६.२०२६ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३, २०२४ आणि २०२५ करिता मार्गदर्शक सूचना**

**पार्श्वभूमी:**

शासन निर्णय क्र सान्यवि-२०२३/प्र.क्र ६०(४) दि. ३० ऑक्टोबर २०२३ अन्वये सर्वकष धोरण निश्चिती करण्याकामी अ.मु.स (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती मार्फत अधिछात्रवृत्तीबाबत सारथी, बार्टी, टीआरटीआय, महाज्योती व अमृत या संस्थांच्या कार्यक्रमांमध्ये आवश्यक समानता आणण्याकरीता सर्वकष धोरण निश्चित करण्यात आले असून सदर समितीची बैठक अ.मु.स (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली दि. १७.०६.२०२६ बैठकीतील निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अहवालास मान्यता प्राप्त झाली. शासन निर्णय क्रमांक सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४) बांधकामे दि. ०१ जुलै २०२६, क्रमांक: बैठक - २०२४/प्र.क्र.०३/बांधकामे दिनांक ३०.०६.२०२६ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३, २०२४ आणि २०२५ अनुषंगाने पीएच.डी अधिछात्रवृत्तीबाबत मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे

**विद्यार्थी निवड निकष:**

**१.** विद्यार्थी अनुसूचित जातीमधील **मातंग**, **मांग**, **मिनीमादीग**, **दखनी-मांग**, **मांग-म्हशी**, **मदारी**, **गारुडी**, **राधेमांग**, **मांग-गारोडी**, **मांग-गारुडी**, **मादगी**, **मादिगा** या जातीचा असणे आवश्यक आहे.

**२.** महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

**३.** पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी अर्जदाराने पीएच.डी. नोंदणी कालावधीतील किंवा त्या लगतच्या मागील एका वर्षातील (उदा. विद्यार्थ्याने जर २०२३ या कॅलेंडर वर्षामध्ये पीएच.डी. नोंदणी केली असेल, तर **UGC-NET** अथवा अन्य परीक्षेचा निकाल २०२२ अथवा २०२३ या कॅलेंडर वर्षाचा ग्राह्य धरला जाईल.) **NET/CSIR-NET/GATE/GPAT/ICAR/AcSIR** किंवा कोणतीही समतुल्य राष्ट्रीय, राज्य किंवा विद्यापीठस्तरीय संशोधन पात्रता परीक्षा, तसेच **SET/MCAER** आणि **PET** या परीक्षा विहित पात्रता गुणांसह (किंवा गुणांच्या आवश्यक मर्यादेसह) उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

**४.** पदव्युत्तर पदवी (**PG**) करीता किमान **B+** ग्रेड गुण मिळणे आवश्यक आहे.

**५.** लाभार्थ्याच्या कुटुंबाचे सरसकट वार्षिक उत्पन रुपये ८.०० लक्ष इतके मर्यादित असावे.

**६. वय- कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे**
(UGC-NET मार्गदर्शक सूचनांनुसार पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी वयोमर्यादा ३५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे. उदा. सन २०२३ करिता दिनांक ०१.०६.२०२३ पर्यंत संशोधक विद्यार्थ्याचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.)

**७.** महाराष्ट्र शासनाच्या आरक्षणाच्या धोरणानुसार अधिछात्रवृत्ती ही योजना राबविणाऱ्या स्वायत्त संस्थांमधील समाज घटकांचे विद्यार्थी पात्र राहतील. तथापि, आरक्षणाच्या धोरणानुसार महिला करिता ३०%, दिव्यांग करिता ५% व अनाथ करिता १ % राहील (सदर आरक्षित जागेवर अर्ज प्राप्त न झाल्यास सर्वसाधारण जागेमधून उमेदवार घेण्यात येतील.)

**८.** सदर अधिछात्रवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे किंवा विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांतील मान्यताप्राप्त संशोधन केंद्र, केंद्रीय

विद्यापीठे किंवा संसदेच्या कायद्यानुसार मंजूर राष्ट्रीय संशोधन संस्थांमध्ये Ph.D.साठी प्रवेशित (पीएच.डी.ची कायम नोंदणी झालेला) असणे आवश्यक आहे.

९. ज्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा **NET (National Eligibility Test)** तसेच इतर राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली आहे, अशा विद्यार्थ्यांना प्राधान्य (**Preference**) दिले जाईल.

पीएच.डी. नोंदणी कालावधीतील किंवा त्या लगतच्या मागील वर्षातील खालील परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

a. NET/ CSIR-NET/GATE/ GPAT/ICAR/AcSIR व समतुल्य परीक्षा उत्तीर्ण
b. SET/ MCAER व समतुल्य परीक्षा उत्तीर्ण
c. PET

या क्रमाने प्राधान्य देण्यात येईल

प्राधान्यक्रम तसेच विद्यार्थी निवड प्रक्रिया याबाबत मा.अ.मु.स. (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक **१७/०६/२०२६** रोजी झालेल्या बैठकीनुसार, मा.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या निर्देशानुसार निर्णय घेण्यात येईल.

१०. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी कोणत्याही वर्षी संस्थेमार्फत दोन वर्ष एम.फिल करीता लाभ घेतला असेल अशा विद्यार्थ्यांना पीएच.डी करिता एकूण ३ वर्ष **SRF** प्रमाणे अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात येईल.

**लाभार्थ्यांची संख्या:**

शासन निर्णय क्रमांक सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४) बांधकामे दि. ०१ जुलै २०२६अधिछात्रवृत्ती योजने अंतर्गत प्रत्येक संस्थांकरीता एकूण विद्यार्थी संख्या १०० निश्चित करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

**अधिछात्रवृत्तीचे विषय:**

**पीएच.डी अधिछात्रवृत्ती योजने अंतर्गत प्रत्येक संस्थेकरीता एकूण मान्य विद्यार्थी संख्येच्या खाली नमूद टक्केवारी नुसार विषयांना जागा वाटप करण्यात आले आहे.**

| **अनु.क्र** | **शाखा** (stream) | **संख्या टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | विज्ञान व तंत्रज्ञान (Science and Technology) | ५५% |
| **२** | मानव्यविद्या व सामाजिक विज्ञान ( Humanities and Social Sciences) | २५% |
| ३ | आंतरविद्याशाखीय अभ्यास (Interdisciplinary Studies) | १०% |
| ४ | वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce and Management) | १०% |
| **एकूण** | | **१००%** |

**अधिछात्रवृत्तीचा कालावधी:**

**कमाल कालावधी:** फेलोशिपचा कमाल कालावधी ५ वर्षांचा असेल.
**मुदतवाढ:** ५ वर्षांनंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये मुदतवाढ दिली जाणार नाही
**कालावधी:** सुरुवातीला २ वर्षांसाठी फेलोशिप मंजूर केली जाईल. (JRF करिता )

**नूतनीकरण आणि पुढील कालावधीत (SRF)** करिता खालील अटींची पूर्तता झाल्यावरच लाभ अनुज्ञेय राहील

१. JRF कालावधीनंतर विद्यार्थ्याने त्रिस्तरीय समितीचा अहवाल आणि Upgradation Certificate प्राप्त केल्यानंतर SRF साठी नियमानुसार लाभ अनुज्ञेय राहील. (नोंदणी दिनांकापासून 2 वर्षे पूर्ण झाल्यानंतर पुढील 3 महिन्यांच्या आत हे कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील.)

२. शोधनिबंध / प्रकाशन (Publication): किमान एक शोधनिबंध खालीलपैकी एका नामांकित जर्नलमध्ये प्रकाशित झालेला असावा:

   Web of Science / Scopus-indexed जर्नल (शक्यतो **Q१/Q२** दर्जाचे) किंवा Clarivate चा Arts & Humanities Citation Index (**AHCI**), विज्ञान, अभियांत्रिकी (Engineering), कला, अर्थशास्त्र (Economics), व्यवस्थापन (Management), वैद्यकीय क्षेत्रासाठीचा **ABCD Index** किंवा इतर कोणत्याही प्रमाणित पीअर-रिव्ह्यू केलेल्या (Peer-reviewed) जर्नलमध्ये किमान **एक शोधनिबंध (Publication)** प्रकाशित असणे आवश्यक आहे.

३. युजीसी (UGC) च्या नियमांनुसार स्थापन केलेल्या संशोधन सल्लागार समितीद्वारे (**Research Advisory Committee - RAC**) दर सहा महिन्यांनी केले जाणारे सकारात्मक पुनरावलोकन (Positive biannual review) आवश्यक आहे.

**ASNRF अधिछात्रवृत्ती अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभाचे स्वरूप:**

अधिछात्रवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांच्या पीएच.डी नोंदणी दिनांकापासून एकूण ५ वर्षे किंवा संशोधन प्रबंध जमा करण्याचा कालावधी जो आधीचा असेल त्या कालावधीपर्यंत अनुज्ञेय राहील.

| **अधिछात्रवृत्ती** | | |
|---|---|---|
| **पीएच.डी** | रुपये ३७,०००/-प्रति महा | **कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (JRF)** |
| | रुपये ४२,०००/- प्रति महा (त्रिस्तरीय समिती अहवाल व upgradation प्रमाणपत्र सादर केल्यानंतर) | **वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (SRF)** |
| | दिव्यांग उमेदवारांसाठी प्रतिमाह रु. 2,000/- देण्यात येईल. (Escort/Reader) | **कनिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (JRF) व वरिष्ठ संशोधन अधिछात्रवृत्ती (SRF)** |

**महत्त्वाचे: अधिछात्रवृत्तीच्या लाभाव्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ (घरभाडे भत्ता, आकस्मिक खर्चाची रक्कम इ.) देण्यात येणार नाहीत, याची संशोधक विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**कार्यपध्दती:**

**१.** पीएच.डी अधिछात्रवृत्ती करीता निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर तसेच अवार्ड लेटर प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्याच्या कालावधीत सहामाही प्रगती अहवाल व अधिछात्रवृत्तीबाबत इतर आवश्यक कागदपत्र आर्टी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

२. अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थी दर सहा महिन्याने **Research Advisory Committee (RAC)** पुढे कामाचा प्रगती अहवाल सादर करेल. अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे संशोधनाचे काम समाधानकारक असल्यास विद्यार्थी पुढील अधिछात्रवृत्तीस पात्र राहील.

३. **देखरेख आणि उत्तरदायित्व (Monitoring Accountability)**
   - द्विवार्षिक प्रगती अहवाल (Biannual Progress Reports): प्रत्येक संशोधक विद्यार्थ्याला वर्षातून दोनदा (दर सहा महिन्यांनी) आपला प्रगती अहवाल सादर करावा लागेल. या अहवालावर मार्गदर्शक (Guide) आणि प्राचार्य (Principal) यांच्या स्वाक्षऱ्या असणे बंधनकारक आहे.
   - कामगिरीचे पुनरावलोकन (Performance Reviews): विद्यापीठ संशोधन सल्लागार समिती (University Research Advisory Committee) दर सहा महिन्यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन कामाचे अधिकृत पुनरावलोकन (Review) करेल.
   - **फेलोशिप वितरण आणि टप्पे (Fellowship Disbursement)**: फेलोशिपची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या संशोधनाच्या टप्प्यांशी (Milestones) जोडलेली असेल. म्हणजेच, कोर्सवर्क पूर्ण करणे, सारांश मंजूर करणे (Synopsis Approval), संशोधन पत्रिकांमध्ये लेख प्रकाशित करणे इत्यादी टप्पे यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतरच फेलोशिपचा निधी दिला जाईल.

४. अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांची संशोधनातील प्रगती समाधानकारक नसल्यास संशोधक विद्यार्थ्याला पुन:श्च सहा महिन्यानंतर पुन्हा एकदा प्रगती अहवाल सादरीकरणाची संधी दिली जाईल. एका वर्षात अपेक्षित प्रगती नसल्याचे **Research Advisory Committee (RAC)** ने नोंदविल्यास सदर विद्यार्थ्यांस अधिछात्रवृत्तीचा लाभ थांबवण्याचा अधिकार अधिछात्रवृत्ती अंतर्गत प्रत्येक संस्थेस/शासनास राहील.

५. अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांने **Ph.D** प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून प्रथम वर्षात किमान **Ph.D course work** पूर्ण करणे व संशोधनाची कार्यपध्दती पूर्ण करणे बंधनकारक राहील.

६. **दर्जेदार प्रकाशने (Quality Publications)**: संशोधकांनी त्यांचे शोधनिबंध नामांकित, इंडेक्स केलेल्या (**Indexed**) आणि पीअर-रिव्ह्यू केलेल्या (**Peer-reviewed**) जर्नल्समध्ये प्रकाशित करावेत, ज्यांना किमान सायटेशन (**Citation**) मानांकन असेल.

७. अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्याने **Ph.D** प्रबंध सादर करण्यापूर्वी **Pre-Synopsis Presentation** सादर करेपर्यंत नियमित अधिछात्रवृत्ती देय राहील. तदनंतर **Ph.D Notification** प्राप्त झाल्यानंतर अंतिम ६ महिन्यातील अधिछात्रवृत्तीची रक्कम देय राहील.

८. संशोधक विद्यार्थ्यांने संशोधन पत्रिका, **Research Synopsis** व **Ph.D** प्रबंधाच्या दोन प्रती संस्थेस सादर कराव्यात.

९. अधिछात्रवृत्तीसाठी अंतिम निवड झालेल्या पूर्णवेळ पीएच.डी. संशोधकाने अधिछात्रवृत्तीच्या कालावधीत कोणत्याही प्रकारची अर्धवेळ, पूर्णवेळ, तासिका तत्त्वावरील किंवा इतर कोणत्याही स्वरूपाची नोकरी/सेवा करणार नाही. याबाबत रु. ५००/- मूल्याच्या **Non-Judicial Stamp Paper** वर हमीपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१०. संशोधक विद्यार्थी जर पीएच.डी नोंदणी कालावधीपासून पुढे तासिका तत्वावर किंवा पूर्ण वेळ नोकरी करीत असेल व तसे त्यांनी प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केले आणि नोकरी सोडल्याचे पत्र संबंधित संस्थेस सादर केले असेल तर अशा विद्यार्थ्यास त्याच्या कामाचा कालावधी वगळून उर्वरित कालावधी करीता अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात येईल.

११. विद्यार्थ्याने प्रति सहामाही प्रगती अहवालासोबत संशोधन केंद्रामध्ये पूर्ण उपस्थित असल्याबाबत उपस्थिती (**Biometric**) पत्रक सादर करणे आवश्यक आहे. अधिछात्रवृत्तीधारकास कोणतेही दीर्घकाळ सुट्टी असणार नाही. तसेच अभ्यास सहल/ कॉन्फरन्स/ कार्यशाळा (**Workshop**) व

पीएच.डी कामासाठी इतर कोठे जाण्यासाठी सदर बाब विद्यार्थ्याने /मार्गदर्शक यांनी सहामाही प्रगती अहवालावर नोंद करावी.

**१२.** अधिछात्रवृत्ती योजनेसाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्ती अधिछात्रवृत्तीधारकास बंधनकारक राहतील.

**१३. फेलोशिप प्रमाणपत्र (Completion Certificate):** अधिछात्रवृत्ती संशोधन पूर्ण झाल्याच्या प्रमाणपत्रावर संशोधकाच्या कामगिरीचा सविस्तर तपशील असेल. यामध्ये त्यांनी प्रकाशित केलेले **शोधनिबंध, मिळालेले पेटंट्स आणि त्यांच्या संशोधनाचा समाजावर झालेला परिणाम (Societal Impact)** स्पष्टपणे नमूद केला जाईल.

**१४. संशोधक विद्यार्थी यांची शैक्षणिक जबाबदारी (Academic and Departmental)**

- **शैक्षणिक कार्य: JRF** - ज्युनिअर रिसर्च विद्यार्थी यांनी विभागाला शैक्षणिक कामांमध्ये मदत करणे आवश्यक आहे, जसे की व्याख्याने (**lectures**) घेणे, लॅब/प्रात्यक्षिके आयोजित करणे, क्षेत्रीय कामाचे (**fieldwork**) पर्यवेक्षण करणे आणि विद्यार्थ्यांच्या चर्चासत्रांना (**seminars**) मार्गदर्शन करणे इत्यादी.
- विभागीय मदत: प्रिन्सिपल इन्व्हेस्टिगेटर (**PI** - मुख्य संशोधक) किंवा विभागप्रमुखांनी दिलेल्या सूचनेनुसार विभागातील इतर कोणतीही कामे करणे.
- ही मदत/काम दरमहा किंवा दर आठवड्याला १० तासांपेक्षा जास्त नसावी
- तसेच, या कामामुळे JRF च्या मुख्य संशोधन कार्यक्रमात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**अधिछात्रवृत्ती रद्द करण्याचे अधिकार**

१. पीएच.डी अधिछात्रवृत्ती बाबत कोणताही वाद उद्भवल्यास संबंधित संस्थेचे संस्था प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील आणि संबंधित अधिछात्रवृत्तीधारकांवर (Fellows) ते बंधनकारक राहील.

२. अधिछात्रवृत्तीधारक उमेदवार अधिछात्रवृत्ती कालावधीमध्ये कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळला किंवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केले किंवा संशोधनातील प्रगती असमाधानकारक असेल तर सदर उमेदवाराची अधिछात्रवृत्ती रद्द करण्याचे अधिकार संबंधित संस्थेचे संस्था प्रमुख यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

३. संशोधक विद्यार्थी यांनी पीएच.डी अधिछात्रवृत्तीचा लाभ घेतला असेल आणि त्याच कालावधीत त्यांनी पूर्णवेळ /अर्धवेळ नोकरी केली असेल व तसे प्रतिज्ञापत्रात नमूद केले नसेल, तर अशा विद्यार्थ्याची अधिछात्रवृत्ती रद्द करण्याचे अधिकार मा.व्यवस्थापकीय संचालक (आर्टी),मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरी/--

**(सुनील वारे)**

**मा.व्यवस्थापकीय संचालक**

**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था**

**(आर्टी),मुंबई**

# पीएच.डी अधिछात्रवृत्ती वेळापत्रक

| अनु.क्र | कृती आराखडा | तपशील | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | जाहिरात घोषणापत्र | संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात, मार्गदर्शक तत्वे तसेच स्वयंघोषणापत्र प्रसिद्ध करणे | ०४/०८/२०२६ ते ०३/०९/२०२६ |
| २. | हेल्पडेस्क विंडो खुली | पात्रता, प्रस्ताव स्वरूप आणि तांत्रिक समस्यांबाबत उमेदवारांच्या शंकांचे निरसरण करणे, संस्था हेल्प लाईन नंबर आणि तांत्रिक हेल्प लाईन नंबर प्रसिद्ध करणे जाहिरातीमध्ये | ०४/०८/२०२६ ते ०३/०९/२०२६ |
| ३. | विद्यार्थ्यांना स्मरणपत्र | अपूर्ण अर्ज असलेल्या नोंदणीकृत विद्यार्थ्यांना स्वयंचलित (Automated) इमेल प्राप्त होईल. | १८/०८/२०२६ आणि २५/०८/२०२६ |
| ४. | अर्ज करण्याची अंतिम मुदत | पोर्टल बंद होण्याची अंतिम तारीख या नंतर कोणतेही अर्ज स्वीकारण्यात येणार नाही | ०३/०९/२०२६ रात्री १२:०० |
| ५ | ऑनलाईन अर्ज आणि आवश्यक कागदपत्राची स्वसाक्षांकित प्रत संस्थेस सादर करणे | ऑनलाईन अर्ज आणि आवश्यक कागदपत्राची स्वसाक्षांकित प्रत संस्थेस सादर करणे | ०३/०९/२६ ते १८/०९/२०२६ |
| ६ | प्राप्त अर्जाची पडताळणी | संस्थेस प्राप्त विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करणे | १८/०९/२०२६ ते ०१/१०/२०२६ |
| ७ | प्रारूप यादी | कागदपत्र पडताळणी झाल्यावर तयार करण्यात आलेली प्रारूप यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे | ०५/१०/२०२६ |
| ८ | Provisional आणि प्रतीक्षा यादी | विद्यार्थ्यांच्या हरकती घेऊन संस्थेच्या संकेतस्थळावर अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल | १५/१०/२०२६ |
| ९ | मूळ कागदपत्र पडताळणी | Provisional आणि प्रतीक्षा यादी मधील विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्र पडताळणी करणे | २१/१०/२०२६ ते २३/१०/२०२६ |
| १० | अंतिम निवड यादी प्रसिद्ध | मूळ कागदपत्र पडताळणी झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची अंतिम यादी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे | ३०/१०/२०२३ |

**(सुनील वारे )**
**व्यवस्थापकीय संचालक**
**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(आर्टी), मुंबई**

**प्रपत्र – ब**

**स्वयंघोषणापत्र**

**मी..............................................................श्री.......................................**

**यांचा मुलगा/मुलगी वय..........वर्ष,आधार क्रमांक (असल्यास).......................................**

**व्यवसाय / नोकरी .............................राहणार..........................................................**

**याद्वारे घोषित करतो/करते कि, मी स्वंय साक्षांकित केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि/किंवा संबधीत कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.**

**ठिकाण.........................** **अर्जदाराची सही.................................**

**दिनांक..........................** **अर्जदाराचे नाव...................................**

# प्रतिज्ञापत्र

मी ------------------------------------------वय---------------व्यवसाय ---------------------------पत्ता ----- ----------------------------------------------------------मोबाईल क्र. ----------------------असे शपथ पूर्वक निवेदन करतो / करते की,

१. मी ---------------------------------------------------------------------------या विषयात पीएच.डी करण्याकरिता दि. ------------------रोजी नोंदणी केली असून----------------------------------------- विद्यापीठामध्ये संशोधन केंद्र --------------------------------------------येथे आहे. सदरच्या विषयासाठी ---------------------------हे माझे मार्गदर्शक आहेत.
२. या पीएच डी. कालावधीत मला विद्यापीठ अनुदान आयोग/ इतर कोणतीही शासकीय संस्था / इतर अर्थ सहाय्य करणाऱ्या संस्था / महाविद्यालय / संस्था / शासन यांचेकडून अर्थसहाय्य किंवा अधिछात्रवृत्ती मिळत नाही .
३. भविष्यात मला इतर कोणत्याही विद्यापीठ अनुदान आयोग / इतर कोणतीही शासकीय संस्था / इतर अर्थ सहाय्य करणाऱ्या संस्था / महाविद्यालय / संस्था / शासन यांचेकडून अर्थसहाय्य मंजूर झाल्यास मी ते मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना कळवून TRTI, पुणेकडून प्राप्त झालेले अर्थसहाय्याची पूर्ण रक्कम परत करण्याची हमी देतो/देते.
४. मी पीएच.डी नोंदणी दिनांकापासून कोणत्याही प्रकारचा पूर्णवेळ किंवा अर्धवेळ रोजगार / नोकरी / व्यवसाय / स्वयंरोजगार करणार नाही.

वरील मजकूर / माहिती सत्य आहे. वरील माहिती असत्य आढळून आल्यास मी दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

शपथार्थीची सही :
शपथार्थीची नाव :

सत्यापन

वरील सर्व मजकूर मी वाचला आहे व तो सत्य आहे तथापि मी आज दि. ......./....../२०२६ रोजी मुक्काम ------ ------------------येथे प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करीत आहे.

आधार कार्ड क्र

शपथार्थीची सही :
शपथार्थीची नाव :